**१९ जुलै - १०वा दिवस** - कालापानी ते नवीडांग ९ कि.मी. प्रवास. ११,०५० फुटावरुन १३,१०० फुटावर जायचे. फार कठीण रस्ता नाही. मोकळे मैदान. आजच्या प्रवासाची प्रचंड उत्सुकता. कारण परमेश्वराच्या चमत्कारांचे दर्शन होणार असते. हवा स्वच्छ, हलके ऊन, पाऊस नाही. खरंच नशिबवान! ओम् पर्वताचे दर्शन. एका उंच पर्वतावर अशा प्रकारचे नैसर्गिक खाचखळगे आहेत की, ज्यात बर्फ साचल्यावर त्याचा आकार ॐ सारखा दिसतो. अगदी वरच्या अर्धचंद्र व टिंबासहीत. दुर्बिणीतून फारच सुंदर दिसते. उघड्या डोळ्यांनी खूप लांबचे अंतर असल्याने फारसे स्पष्ट दिसत नाही. ढग सारखे येत जात असतात आणि ढगाआड ॐ लपत असतो. वाडवडिलांची पुण्याई म्हणून आम्हांला मात्र ॐचे स्पष्ट, पूर्ण व जवळजवळ दिवसभर दर्शन झाले. नवीडांगचा कँप या ॐ पर्वताच्या पायथ्याशीच आहे. अगदी संध्याकाळ होईपर्यंत आम्ही दर्शन घेऊ शकलो. रात्री लवकर झोपलो. कारण उद्या सकाळी लवकर उठून चीनमध्ये प्रवेश करायचा आहे. आतापर्यंत काढलेले सगळे फोटो रोल्स, व्हिडीओ कॅसेट वगैरे सगळे इथेच सोडून जायचे असते. चीनमध्ये जातांना फक्त कोरे रोल्स नेता येतात.

चीनमध्ये कैलास पर्वताच्या परिक्रमेत व मानससरोवराच्या परिक्रमेत जे कँप आहेत त्यात १५ ते १७ लोकांचीच एकावेळी राहायची सोय असल्याने आपल्या यात्रेकरुंचे दोन ग्रुप केले जातात. एक ग्रुप कैलास परिक्रमेला जातो. त्याचवेळी दुसरा ग्रुप मानस परिक्रमेला जातो आणि नंतर कैलासचा मानसला व मानसचा कैलासला अशी अदलाबदल होते. भारतातल्या यात्रेत भारत सरकार आपल्या यात्रेकरुंची खूपच काळजी घेते. खाणे, राहणे, वैद्यकिय मदत वगैरे सगळे अगदी चोख असते. पण चीनमध्ये मात्र यातील कुठलीच सुविधा नसते. विशेषत: वैद्यकिय मदत मिळणे फारच मुश्किल असते. यात्रेकरुंचे दिल्लीला जे सिलेक्शन होते त्यावेळी प्रत्येक बॅचमध्ये निदान दोन-चार यात्रेकरु हे डॉक्टर असतीलच असे कटाक्षाने पाहिले जाते. कारण हे डॉक्टर सहयात्री हेच आपल्याला वैद्यकिय मदत देऊ शकतात. म्हणून दिल्लीहून निघतांनाच जास्तीची औषधे, बँडेज वगैरे घेतलेले असतात. नवीडांगला असेच आमचे दोन ग्रुप करण्यात आले. आमच्या ग्रुपमध्ये शिंदे डॉक्टर कुटुंब तर दुसऱ्या ग्रुपमध्ये डॉक्टर पारीख होते. हे दोन्ही जिवलग मित्र, एकत्र यात्रा करण्याच्या अटीवर आलेले पण केवळ यात्रेकरुंच्या मदतीसाठी त्यांना ताटातूट सहन करावी लागली. या डॉक्टरांची आम्हां सगळ्या यात्रेकरुंना खूपच मदत झाली.

**२० जुलै - अकरावा दिवस** - नवीडांग ते लिपूलेख बॉर्डर ते तकलाकोट पर्यंतचा प्रवास. सकाळी साडेतीनलाच उठलो व सगळा ग्रुप एक कतारीत चार वाजता निघाला. आजचा प्रवास हा आतापर्यंतचा सगळ्यात खडतर प्रवास. सकाळी अंधारात चक्क टॉर्चच्या प्रकाशात मार्गक्रमण. नवीडांग १३,८०० फुटावरुन लिपूलेख १७,५०० फुटावर म्हणजे ३,७०० फूट उंचीवर जायचे. निघतानाच पाऊस सुरु झालेला होता. अंधारात प्रवास, हवा विरळ, ऑक्सिजन कमी. अंतर सातच कि.मी. पण फारच खडतर. लिपूलेख पास ही भारत-चीनची सरहद्द. आजूबाजूला प्रचंड बर्फ, प्रत्येकालाच त्या वातावरणाचा त्रास होतो. हातपाय गार पडतात, उलट्या होतात, डोके गरगरायला लागते. उभा चढ आहे. मिलिटरीच्या डॉक्टरांना याची पूर्ण कल्पना असल्याने ते जवान तुमच्या हातापायाला मसाज करुन ऊब आणतात. औषध देतात आणि महत्वाचे म्हणजे धीर देतात. वरुन पाऊस, खाली बर्फ, अंगावर प्रचंड कपडे. या सरहद्दीवर आपले घोडेवाले, हमाल, मिलिटरीचे जवान, डॉक्टर, वायरलेस हा सगळा ताफा भारताच्या हद्दीतच राहतो. चीनमध्ये फक्त यात्री आणि भारत सरकारचा प्रतिनिधी म्हणजे आपल्याबरोबर दिल्लीहून आलेला संपर्क अधिकारी. यावेळी एक बॅच चीनमधून भारतात यात्रा संपवून प्रवेश करते व एक ग्रुप भारतातुन चीनमध्ये प्रवेश करतो. ही बॅचेस्ची देवाण-घेवाण भारत-चीन सरहद्दीवर होते. येणारे व जाणारे यात्रेकरु एकमेकांना अतिशय प्रेमाने आलिंगन देतात. एकमेकाची विचारपूस करतात. परत जाणारे यात्रेकरुंमध्ये महाराष्ट्राचे कोणी आहे का, नाशिकचे कोणी आहे का, असे विचारल्यावर पुण्याचे यात्री भेटले, त्यांना नाशिकचा आमचा घरचा फोन नंबर दिला आणि सांगितले की नाशिकला कळवा की आमची सरहद्द पर्यंतची यात्रा सुखरुप झालेली आहे. चीनमध्ये प्रवेश केल्यावर अगदी उताराचा रस्ता आहे. तिथे बर्फावरुन चालण्याचा, घसरण्याचा, पडण्याचा अनुभव आला. बराचसा उताराचा रस्ता पार केल्यानंतर चिनी घोड्यांवर सक्तीने बसावे लागते. मी ज्या घोड्यावर बसलो त्याची मालकीणबाई आरामात लांबून चालत होती. पहिला झटका तिथेच बसला. भारतातले घोडेवाले तुम्हाला खूपच मदत करतात. घोड्याबरोबरच चालतात. जेणेकरुन तुम्हाला भीती वाटू नये. तुमची एखादी बॅग धरतात, पाण्याची बाटली घेतात. पण चिनी घोड्यावाल्यांना अजिबात

सोयरसुतक नसते. थोडे अंतर गेल्यावर घोड्याने मला दाणकन खाली आपटले कारण त्याची मांड बांधलेलीच नव्हती. ती निसटली नि मी भूईसपाट झालो. असाच अनुभव इतरांनाही आला. साधारण पाच कि.मी. घोड्यावरचा कठीण प्रवास केल्यावर आम्ही बसजवळ पोहोचलो. आमचे सगळे सामान एका उघड्या ट्रकमध्ये आणि आम्ही यात्रेकरु त्या बसमध्ये. रस्ता हा प्रकार नव्हताच, खाचखळग्यातुन, नदीनाल्यातुन, दगडधोंड्यातुन ती बस शरीरातल्या प्रत्येक हाडाची परीक्षा घेत शेवटी एकदाची तकलाकोटला पोहोचली. प्रचंड धूळ, कडक ऊन अशा वातावरणात तकलाकोटला आमचे आगमन झाले. गेल्यावर चिनी चहा पिऊन, आमच्या सामानाची तपासणी, पासपोर्टवर शिक्के, कॅमेऱ्यांची तपासणी होऊन आम्ही आम्हाला दिलेल्या खोल्यांमध्ये आलो. तकलाकोटचे हे पुरंग गेस्ट हाऊस तसे बरे आहे. प्रत्येक खोलीत पाच जण, प्यायला गरम पाणी, पन्नास वर्षापूर्वींच्या पध्दतीचे टोपली संडास की ज्याची सफाई बहुधा वर्षातुन एकदाच होत असावी. नाक दाबल्याशिवाय संडासात प्रवेशच करु शकत नाही. त्यांच्या जेवणाच्या व इतर सर्वच वेळा ते तंतोतंत पाळतात. आम्ही तिथे पोहोचल्यावर जेवणाची वेळ टळून गेली असल्याने बरोबर आणलेल्या फराळावरच जेवण आटोपले.

रात्रीचे जेवण म्हणजे बोरासारखी, लिचीसारखी फळे, भात, सूप वगैरे, तसे चांगलेच जेवण होते. तकलाकोट १३,५०० फूट उंचीवर आहे पण कडक ऊन आणि प्रचंड धूळ यामुळे त्रासच होतो. हे एक लहान शहर आहे. येथूनच कैलास-मानसला जाता येत असल्याने बाजारपेठ आहे. तिथे अनेक वस्तू मिळतात. विशेषत: मानस सरोवराचे तीर्थ आणण्यासाठी प्लॅस्टिकच्या कॅन्स येथे घेतात. आम्ही बाजारात चक्कर मारली. गेस्ट हाऊसच्या शेजारीच बँक आहे. थोड्या अंतरावर कस्टम हाऊस आहे. दोन्ही ग्रुपसाठी एक एक तिबेटीयन गाईड असतो. त्याला तोडकेमोडके इंग्रजी व हिंदी येत असते. चीनमध्ये असेपर्यंत तोच आपला मार्गदर्शक, मित्र, सगळा संपर्क त्याच्यामार्फतच. इथून आपल्याला भारतात फोन करतो येतो. दिल्ली सोडल्यानंतर धारचुलाहून म्हणजे प्रवासाच्या दुसऱ्या दिवशी आपण फोन करु शकतो. नंतर थेट प्रवासाच्या अकराव्या दिवशीच. मधले नऊ दिवस जगाशी कुठलाही संपर्क नाही, वर्तमानपत्र नाही, टी.व्ही. नाही, बातम्या नाही, फोन नाही. रोज सकाळी उठायचे आणि चालायला लागायचे. जेवायचे आणि झोपायचे एवढाच कार्यक्रम. आमच्या बरोबरच्या मद्रासच्या विजयाम्मा यांनी त्यांचे आईला फोन केला. या इकडुन अम्मा अम्मा आणि त्यांची आई तिकडुन विजया विजया पूर्ण ३ मिनिट एवढेच बोलत राहिल्या कारण त्यांना एकमेकींशी काय बोलावे हेच सुचत नव्हते. सगळ्यांची जवळ जवळ तिच परिस्थिती होती.

**२१ जुलै - बारावा दिवस** - तकलाकोट. आजचा दिवस हा तसा आरामाचा दिवस. आज बँकेतुन डॉलर देऊन चिनी युआन घेतलेत. ४ रु.५० पैशाला एक युआन. इथे खर्च करायला वावच नाही. पण पुढे याक व घोडेवाल्यांना देण्यासाठी चिनी चलन पाहिजे. आज पुन्हा बाजारात चक्कर. आजचा दिवस चीनने तिबेटला गिळंकृत केल्याचा चीन सरकारचा शासकीय समारंभ होता. त्यात नाच, गाणी तसेच इतर सांस्कृतिक कार्यक्रम होते. त्या कार्यक्रमाला तिबेटी लोक फारच थोडे होते पण चीनी पोलिसांचा प्रचंड मोठा ताफा होता.

**२२ जुलै - १३ वा दिवस** - आज अगदी सकाळी उठून पुढच्या प्रवासाला निघालो. अंधारातच बसचा प्रवास सुरु झाला. आपआपले सामान व काठी घेऊन बसने तकलाकोट सोडले, सकाळी उजाडल्यावर बस थांबली, खाली उतरुन पाहतो तर समोर सूर्योदयाच्या प्रकाशात चकाकणारी गुरु-मंधाता डोंगराजीतली बर्फाच्छादित शिखरे, अतिशय वेधक दृष्य, नंतरचा प्रवास तसाच दगडधोंड्यातून, नदीनाल्यातुन, कुठलाही आखीव रस्ता नसलेल्या वाटेतुन, रस्त्याने जाताना सगळीकडे अगदी रुक्ष, भकास, वाळवंटासारखेच, कुठेतरी दोनचार घरांची वस्ती, त्याच्याजवळ थोडीफार झाडे व शेती, अन्यथा सगळीकडे वाळवंटच. इतकी प्रचंड धूळ की नाकाला पांढरे फडके (डॉक्टर लोक ऑपरेशनच्या वेळी बांधतात तसें) बांधल्याशिवाय श्वासच नाही घेता येत. कडक ऊन, धूळ पण थंडीसुध्दा. १६,२०० फूटावर गुरला पास ओलांडल्यावर पहिले दर्शन होते ते राक्षसताल सरोवराचे. या ठिकाणी आमची बस थांबली. राक्षसताल सरोवराच्या काठापर्यंत आम्ही गेलो पण आमच्या गाईडने त्या पाण्याला स्पर्श करु दिला नाही. ते पाणी कडू आहे व त्याला स्पर्श करणे अशुभ आहे असे सांगितले. याला रावणह्रद असे सुध्दा म्हटले जाते. या ठिकाणी रावणाने भगवान शंकराची आराधना केली. आपल्या आतड्यांची वीणा वाजवून शंकराला प्रसन्न केले. शंकर प्रसन्न झाल्यावर रावणाने शंकराजवळ आपल्या राज्यात कैलासपर्वत उचलून नेण्याची

परवानगी मागितली, जेणेकरुन भगवान शंकराच्या दर्शनासाठी रावणाला इतक्या लांबपर्यंत रोज यायला नको. रावणाने कैलास पर्वताला आपल्या बाहूंचा विळखा घालून उचलायचा प्रयत्न करताच शंकराने आपल्या पायाच्या आगंठ्याने रावणाचे मस्तक दाबले, आणि रावण थरथरत दूर फेकला गेला. येथे दैत्य, असूर, राक्षस, शंकराची पूजा, आराधना करीत. राक्षसतालचा परिघ १२२ कि.मी. आहे. पाणी शांत असून, रंग काळपट आहे. राक्षसतालच्या वायव्येकडून सतलज नदीचा उगम होतो. राक्षसताल पासून थोड्या अंतरावर मानससरोवर आहे. त्याचे दर्शन झाल्यावर डोळ्यातून पाणी यायला लागले. उर भरुन आले आणि वाटले, ज्याच्यासाठी केला होता एवढा अटट्हास त्या पवित्र मानस सरोवराचे दर्शन या जन्मी आपल्याच डोळ्यांनी आपल्याला झाले याच्याएवढे पुण्य ते कोणते. इथे आमची बस थोडावेळ थांबली. तेवढ्यात काही लोकांनी मानस सरोवराच्या पाण्याला स्पर्श करुन, डुबकी मारुन घेतली. नंतर आमची बस होरे या कँपवर गेली. तेथे 'बी' ग्रुपला म्हणजे मानस सरोवर परिक्रमेच्या ग्रुपला सोडुन आमच्या 'ए' ग्रुपला दारचेनच्या कँपवर पोहोचवले. दारचेन हे १७,००० फूट उंचीवर आहे. हा कॅम्प म्हणजे जुन्या पध्दतीच्या गावासारखा आहे. इथे एक भिंत (मातीचीच कंपाऊड वॉल) आहे, जिच्यातुन प्रवेश करुन कँपवर जाता येते. आम्ही दुपारी पोहोचलो. खोल्या म्हणजे ५-५, ७-७ लोकांची एकत्र सोय. संडासची सोय नाही. मोकळ्या मैदानात जावे लागते. मी व ही आम्ही दोघे संडासला म्हणून बाहेर पडलो. भिंतीच्या आत असेपर्यंत आकाश निरभ्र, ऊन, अशी परिस्थिती होती. पण आम्ही भिंतीच्या पलीकडे गेल्याबरोबर अचानक आकाशात ढगांचा गडगडाट, विजा चमकू लागल्या आणि चक्क पावसाला सुरुवात झाली. चांगल्या बोराएवढ्या गारा पडायला लागल्या. आम्ही खूप घाबरलो. कपडे ओलेचिंब झाले. धावतपळत आम्ही भिंतीच्या आत आलो आणि काय आश्‍चर्य? जणू काही घडलेच नाही. आकाश निरभ्र, एक ढग नाही. आमच्या मित्राने विचारले की पलीकडच्या नाल्यात काय आंघोळ वगैरे करुन आलात की काय? ओले कसे झालात? तर त्यांना आम्ही आमची कहाणी सांगितली. शेजारीच उभ्या असलेल्या आमच्या चीनी गाईडने सांगितले की यात काही आश्‍चर्य नाही. असे घडते. परमेश्‍वर तुम्हांला घाबरवतो. तुमची परीक्षा पाहतो. कँपवरुन आम्ही कैलास पर्वत कुठे दिसतो का ते पाहिले पण दर्शन झाले नाही. समोर मात्र गुरला मंधाता पर्वत राजीचे अतिशय विहंगम दृश्य दिसत होते. सगळीकडे बर्फाच्छादित शिखरे, पांढऱ्या ढगांचा लपंडाव, खूपच सुंदर दृष्य होते. रात्री पहिल्यांदा आम्ही स्वत: म्हणजे ग्रुपचा एकत्र स्वयंपाक केला. मिल्कमेड पावडरच्या दुधाचा चहा केला. प्रीकुक्ड् राईस जो दिल्लीहुन नेला होता त्याचा भात केला. चिनी सरकार आपल्याला फक्त एक पेट्रोलचा स्टोव्ह देते व गरम पाणी (स्वयंपाक व पिण्यासाठी फक्त) देते. ते जेवण म्हणजे केवळ उदरभरण यापेक्षा दूसरा हेतूच नव्हता. थंडगार हवा होती. त्याचवेळी नेपाळमार्गे खाजगी यात्राकंपनीच्या यात्रेकरुंचा एक ग्रुप आला. ते जीपने काठमांडूहून ४-५ दिवस प्रवास करुन आलेले होते. प्रत्येकाच्या अंगावर प्रचंड कपडे होते तरी ते थंडीने कुडकुडत होते. आम्ही मात्र साध्या कपड्यात होतो. त्या लोकांना मोठे आश्‍चर्य वाटले. त्यांनी कुतूहलाने विचारले की तुम्हाला थंडीचा त्रास होत नाही का? आम्ही त्यांना सांगितले की, आम्ही दिल्लीहुन निघून टप्प्याटप्प्याने रोज चालत व रोज उंची गाठत प्रवास केला असल्याने आमच्या शरीराला हळूहळू या वातावरणाची सवय झाली आहे. समरस झाले आहे म्हणून आम्हाला त्रास होत नाही. तुम्ही अगदी कमी दिवसात वाहनाने कुठलेही शारीरिक श्रम न करता एकदम प्रतिकूल वातावरणात आला आहात म्हणून तुम्हाला त्रास होतो. हा अतिशय महत्वाचा मुदद् आहे. भारत सरकारतर्फे या यात्रेला येण्यात कुठलाही धोका नाही, त्रास नाही. कारण ही सबंध यात्रा टप्प्याटप्प्याने होत असते व तुमचे शरीर, तुमचे मन, तुमची इच्छाशक्ती दिवसागणिक प्रबळ होत जाते. नेपाळमार्गे वाहनाने आलेल्या यात्रेकरुंना भयानक त्रास होतो. काही मृत्युमुखी पडतात. शक्यतो फारच थोडे लोक प्रत्यक्ष कैलासची व मानसची परिक्रमा करतात. ते फक्त लांबूनच दर्शन घेतात. पण भारत सरकारच्या या यात्रेतील प्रत्येक जण या परिक्रमा हमखास करतातच कारण हाच त्यांचा मुख्य उद्देश असतो. हा माझा अनुभव मी जेव्हा माझ्या नेपाळच्या मित्रांना सांगितला व मी या प्रवासाचे व्हिडीओ शूटींग जेव्हा दाखवले तेव्हा नेपाळचे रहिवासी माझे मित्र भारतातुन भारत सरकारमार्फत घडविणाऱ्या या यात्रेत सहभागी होऊ इच्छित आहेत.